महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १०८ वे | दिनांक : १३/०४/२०२६ | वार : सोमवार

# सुरांची सुंदर बाग आज उजाड झाली; संगीताच्या एका सुवर्णयुगाला विराम मिळाला



सुरांची मल्लिका आशा भोसले यांचे आज 92 व्या वर्षी निधन झाले. त्यांना शनिवारी रात्री छातीत संसर्ग झाल्याने मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आशा भोसले गेल्या 70 वर्षांपासून हिंदी चित्रपटसृष्टीचा भाग होत्या. त्यांनी अनेक भाषांमध्ये विक्रमी 12 हजार गाणी गायली. त्यांच्याशिवाय हिंदी चित्रपटसृष्टीची कल्पना करणेही कठीण आहे, मात्र एक काळ असा होता जेव्हा आशा भोसले यांना त्यांचा आवाज खराब आहे असे सांगून रेकॉर्डिंग स्टुडिओतून बाहेर काढण्यात आले होते.

आज जगभरातील अनेक हॉटेल्सच्या मालकीण असलेल्या आशा भोसले यांचे बालपण गरिबीत गेले. गरिबीची ती अशी अवस्था होती की, त्या मोठ्या बहीण लता मंगेशकर यांच्यासोबत चोरून शाळेत जात असत, जेणेकरून वडिलांना फी भरावी लागू नये. मात्र, पकडल्या गेल्यावर त्यांना शाळेतून काढून टाकण्यात आले होते.

८ सप्टेंबर १९३३ रोजी आशा भोसले यांचा जन्म ब्रिटिश भारतातील सांगली येथे झाला. त्यांचे वडील पंडित दीनानाथ मंगेशकर हे रंगमंच कलाकार होते. घरात इतकी गरिबी होती की, मोठी बहीण लता मंगेशकर यांना जेव्हा शाळेत दाखल करण्यात आले, तेव्हा त्या आशाला गुपचूप शाळेत घेऊन जाऊ लागल्या. शिक्षकांपासून लपून त्या आशाला सोबत बसवत असत.शाळेत जाऊन अवघे दोनच दिवस झाले होते की, एके दिवशी मास्तरांनी चोरी पकडली. त्यांनी दोघींनाही वर्गातून बाहेर काढले आणि सांगितले की, एका फीमध्ये एकच मूल शाळेत येऊ शकते. दोघीही घरी परतल्या. दुसऱ्या दिवशी लतांनी ठरवले की ती धाकट्या बहिणीला शिकवेल. तिने वडिलांशी बोलून शाळेतून आपले नाव काढून घेतले आणि आपल्या जागी बहीण आशाचा प्रवेश घेतला. आशा अवघ्या ९ वर्षांच्या होत्या, तेव्हा त्यांचे वडील दीनानाथ मंगेशकर यांचे निधन झाले. अशा परिस्थितीत लतांनीच संघर्ष करून हिंदी चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवले आणि बहिणींचे संगोपन केले. कुटुंब आधी पुणे आणि नंतर मुंबईत येऊन स्थायिक झाले. येथे अवघ्या १० वर्षांच्या वयात आशा भोसले यांनी गाणे सुरू केले. त्यांना पहिला ब्रेक मराठी चित्रपट 'माझा बाळ' (१९४३) मधील 'चला चला नाव बाळा' या गाण्याने मिळाला.

आशा फक्त 15 वर्षांच्या होत्या, जेव्हा त्यांना हिंदी चित्रपट 'चुनरिया' मधील 'सावन आया' हे गाणे गाण्याची संधी मिळाली. त्या काळात नूर जहाँ, शमशाद बेगम यांसारख्या गायकांचा इंडस्ट्रीत दबदबा होता. लता मंगेशकरही हळूहळू ओळख निर्माण करत होत्या, पण आशा या यादीत कुठेही नव्हत्या. त्यांना फक्त तेव्हाच संधी मिळत असे, जेव्हा चित्रपट निर्माते मोठ्या गायकांची फी देऊ शकत नव्हते किंवा इतर गायिकांनी नकार दिला होता.

**गाणे रेकॉर्ड करायला पोहोचल्या, तेव्हा आवाजावर टोमणा मारून स्टुडिओतून बाहेर काढले**

आशा भोसले यांना एकदा खराब आवाज असल्याचे सांगून किशोर कुमार यांच्यासोबत रेकॉर्डिंग स्टुडिओतून बाहेर काढण्यात आले होते. 1947 सालची गोष्ट आहे. आशा, किशोर कुमार यांच्यासोबत प्रसिद्ध स्टुडिओमध्ये राज कपूर आणि नरगिस अभिनीत 'जान पहचान' चित्रपटासाठी एक गाणे रेकॉर्ड करायला गेल्या होत्या. या चित्रपटाचे संगीत दिग्दर्शक खेमचंद प्रकाश होते.

तेव्हा स्टुडिओमध्ये कोणतीही विशेष सुविधा नव्हती, माइकही फक्त एकच असायचा आणि गायकांना त्याच्यासमोर उभे राहून गावे लागत असे. आशा आणि किशोर दा यांनी गाणे सुरू करताच, तिथे रेकॉर्डिस्ट रॉबिन चटर्जी यांनी हळूच संगीत दिग्दर्शक खेमचंद्र यांना बंगालीमध्ये सांगितले - या दोघांचा आवाज माइकमध्ये चांगला येत नाहीये, दुसरे गायक आणा. जवळ उभे असलेल्या किशोर दा यांना हे बोलणे समजले आणि त्यांनी आशाला सांगितले की इथे काहीतरी गडबड आहे. त्यांचे गाणेही थांबवण्यात आले आणि थोड्याच वेळात त्यांना तिथून निघून जाण्यास सांगितले. रात्रीचे २ वाजले होते. दोघेही या अपमानाने खचले आणि तिथून निघून महालक्ष्मी स्टेशनजवळ बसले आणि त्यांच्याकडून नेमकी कुठे चूक झाली, यावर चर्चा करू लागले.

**अनेक वर्षांनी किशोर कुमार यांनी घेतला होता, स्वतःच्या आणि आशाच्या अपमानाचा बदला**

१९५७ पर्यंत आशा भोसले यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत आपली ओळख निर्माण केली होती. त्यांचे 'उड़ें जब-जब जुल्फें तेरी' हे गाणे खूप गाजले होते. किशोर कुमार यांनीही आपली ओळख निर्माण केली होती. यश मिळाल्यानंतर, एके दिवशी त्यांना पुन्हा त्याच स्टुडिओमध्ये रेकॉर्ड करण्याची संधी मिळाली. तिथे रॉबिन चटर्जी देखील उपस्थित होते, ज्यांनी अनेक वर्षांपूर्वी त्यांना आणि आशाला स्टुडिओतून बाहेर काढले होते. आशाताई संकोचामुळे काही बोलू शकल्या नाहीत, पण किशोर कुमारने संधीचा फायदा घेतला आणि रेकॉर्डिस्टला म्हणाले- का, तुम्ही तर म्हणाला होतात की आम्ही गाऊ शकत नाही. आता तुम्हीच बघा की आम्ही कुठे आहोत.

**१६ व्या वर्षी पळून जाऊन लग्न केले, बहिणीसोबतचे संबंध बिघडले**

१० वर्षांच्या वयात गाणं सुरू करणाऱ्या आशा भोसले यांना अवघ्या १६ व्या वर्षी सेक्रेटरी गणपतराव भोसले यांच्यावर प्रेम जडले. गणपतराव त्यांच्यापेक्षा १५ वर्षांनी मोठे होते. कुटुंबाला हे नाते कधीच मान्य होणार नाही हे त्यांना माहीत होतं, त्यामुळे त्यांनी १६ व्या वर्षी घरातून पळून गणपतराव यांच्याशी लग्न केलं. हा निर्णय त्यांच्यासाठी आनंदापेक्षा जास्त दुःख घेऊन आला. लग्नानंतर त्यांना पती आणि सासरच्यांकडून चांगली वागणूक मिळाली नाही. वेळ जात राहिला, पण नात्यातील कटुता वाढतच गेली.

लग्नानंतर आशा यांना ३ मुले झाली. काही वर्षांनंतर, संशय आणि तणावाने भरलेल्या या नात्याने अखेर दम तोडला. गणपतराव यांनी त्यांना घरातून काढून टाकले. त्यावेळी आशा दोन मुलांसोबत होत्या आणि तिसऱ्या मुलाची आई होणार होत्या. नाइलाजाने त्यांना आपल्या माहेरी परतावे लागले. १९६० साली ते दोघे वेगळे झाले.

**मुलीने गोळी झाडून आत्महत्या केली, मुलाचा कर्करोगाने मृत्यू झाला**

आशा भोसले आणि गणपत राव यांना तीन मुले होती. त्यांचा मोठा मुलगा हेमंत भोसले यांनी सुरुवातीला पायलट म्हणून काम केले, पण नंतर त्यांनी संगीत क्षेत्रात पाऊल ठेवले. त्यांनी काही अविस्मरणीय गाणीही दिली, मात्र त्यांचे गायन करिअर फार काळ टिकले नाही. २०१५ मध्ये कर्करोगाने त्यांचे निधन झाले.

आशा यांची मुलगी वर्षा भोसले, एक प्रसिद्ध स्तंभलेखिका होत्या. पतीपासून घटस्फोट घेतल्यानंतर त्यांनी ५५ व्या वर्षी गोळी झाडून आत्महत्या केली होती. त्यांचा सर्वात धाकटा मुलगा आनंद भोसले यांनी व्यवसाय आणि चित्रपट दिग्दर्शनाचा अभ्यास केला आणि आज ते त्यांच्या आईच्या करिअरची जबाबदारी सांभाळतात.




# गुन्हे कसे मागे घेत नाहीत मी बघतोच : मनोज जरांगे यांचा सरकारला इशारा



**जालना :** मराठा आरक्षणाच्या लढ्यातील नेते मनोज जरांगे पाटील यांनी गुन्हे मागे घेण्याच्या मुद्द्यावरून पुन्हा एकदा राज्य सरकारविरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे. "सरकारने दिलेला शब्द पाळला नाही. तर राज्यामध्ये आतापर्यंतचे सर्वात मोठे आंदोलन उभे करू आणि सरकारला गुन्हे मागे घेण्यास भाग पाडू. गुन्हे कसे मागे घेत नाहीत, मी बघतोच." असा थेट इशारा त्यांनी दिला आहे. यावेळी त्यांनी मराठा आरक्षणासंदर्भातील मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावरही जोरदार हल्लाबोल केला.

मराठा आंदोलकांवरील सरसकट सर्व गुन्हे मागे घेण्याचे आश्वासन अद्याप पूर्णपणे प्रत्यक्षात आले नसल्याचे चित्र समोर आले आहे. गृहविभागाने मराठा आरक्षण उपसमितीच्या बैठकीत सादर केलेल्या ताज्या आकडेवारीनुसार, आतापर्यंत आंदोलकांवरील अर्ध्याहून अधिक गुन्हे मागे घेण्यात आले असले, तरी गंभीर स्वरूपाच्या प्रकरणांतील आंदोलकांना मात्र कायदेशीर प्रक्रियेला सामोरे जावेच लागणार आहे. सर्व गुन्हे मागे घेण्याची मागणी होत असली, तरी 'गंभीर' स्वरूपाचे गुन्हे मागे घेण्यास गृहविभागाने नकार दिला आहे. यावरून मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला निर्वाणीचा इशारा दिला आहे.

आंदोलनादरम्यान आंदोलकांवर दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याचे आश्वासन सरकारने दिले होते, याची आठवण जरांगे पाटील यांनी करून दिली. त्यांनी गुन्ह्यांची सविस्तर आकडेवारी मांडत प्रशासनावर ताशेरे ओढले. एकूण दाखल गुन्ह्यांपैकी ६० ते ६२ गुन्हे हे न्यायप्रविष्ट आहेत. सरकारने यावर सकारात्मक अहवाल देऊन ते मागे घेण्याची प्रक्रिया पूर्ण करायला हवी. सुमारे ८० गुन्हे अशा स्वरूपाचे आहेत, ज्याबाबत विभागीय समितीचा अहवाल येणे अद्याप बाकी आहे. हा अहवाल प्राप्त होताच सरकारने हे गुन्हे तातडीने मागे घ्यावेत, अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली.

"सरकार आणि विशेषतः देवेंद्र फडणवीस जरी त्यांच्या शब्दापासून फिरले असले, तरी मी त्यांना बदलू देणार नाही. मी खंबीर आहे, गुन्हे कसे मागे घेतले जात नाहीत, ते मी बघतोच," अशा शब्दांत जरांगे यांनी इशारा दिला आहे.

मराठा आरक्षणासाठी स्थापन झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या कामावर जरांगे पाटील यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर टीका करताना ते म्हणाले की, "उपसमितीने केवळ दिखाव्यासाठी 'थातूर-मातूर' बैठका घेऊ नयेत. मराठा समाजाला अपमानास्पद वागणूक देण्याचे प्रकार थांबले पाहिजेत. ही समिती मराठ्यांच्या अंगावर मराठे घालण्यासाठी किंवा कोणाचा माज जिरवण्यासाठी नाही, तर समाजाला न्याय देण्यासाठी आहे, याचे भान अध्यक्षांनी ठेवावे."

विभागीय समितीचा अहवाल येताच सरकारने सर्व गुन्हे मागे घ्यावेत, अन्यथा शांत असलेला मराठा समाज पुन्हा एकदा रस्त्यावर उतरेल, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे. उपसमितीने मराठ्यांची अंतर्गत झुंज लावण्याचे प्रयत्न थांबवून ठोस निर्णय घ्यावेत, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १३ एप्रिल २०२६

## फुले- शाहू-आंबेडकरांचे विचार आचरणातूनच सामाजिक समता निर्माण होईल - प्रा. किरण सगर



**वडगाव (गांजा) :** येथे विविध उपक्रमांनी सामाजिक समता सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, धाराशिव यांच्या वतीने महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त दि. 8 ते 14 एप्रिल दरम्यान जिल्हातील विविध भागात सामाजिक समता सप्ताह साजरा करण्यात येत आहे. त्या अंतर्गत शनिवारी (ता. 11) रोजी वडगाव, ता. लोहारा येथे क्रांतिसूर्य महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी समाज कल्याण सहाय्यक आयुक्त सचिन कवले हे अध्यक्षस्थानी होते. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे माजी सरचिटणीस प्रा. किरण सगर प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी विचारमंचावर समाज कल्याण अधिकारी सनम लामकने, मुरूम नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन भुजबळ, बार्टीचे प्रकल्प अधिकारी तुषार कदम, उपसरपंच बबन फुलसुंदर, शालेय समिती चे अध्यक्ष सचिन पवार आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना प्रा. सगर म्हणाले की, समाजातील अनिष्ट प्रथा, रुढी, परंपरा नष्ट करणे, जाती निर्मुलन, स्त्री-पुरुष समानता, लग्नातील अनाठायी खर्च, व्यसनमुक्ती, हुंडाबळी, नरबळी, शेतकरी आत्महत्या यावर खऱ्या अर्थाने योग्य दिशेने कार्य करावयाचे असल्यास, महामानवाच्या स्वप्नातील भारत घडवायचा असेल तर त्यांच्या विचारांचे कृतीशील अनुकरण करावे लागेल. त्याशिवाय पर्याय नाही, असे मत मांडत सविस्तर मार्गदर्शन केले.तर सहाय्यक आयुक्त सचिन कवले यांनी महापुरुषांच्या जयंतीनिमित्त समाज कल्याण विभागाच्या विविध योजनांची माहिती देत नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. मुख्यमंत्री वयोश्री योजना, मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना, स्वाधार योजना, ऍट्रॉसिटी कायदा, बचत गटानां ट्रॅक्टर वाटप, जातपडताळणी, थोर महामानवांच्या जयंती साजरी करणे या बद्दल माहिती दिली.मान्यवरांच्या हस्ते गावातील नव्याने पोलीस व सैन्यात भरती झालेल्या युवकांचा सत्कार करण्यात आला तसेच रक्तदात्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. सरपंच बबन फुलसुंदर यांच्याकडून रक्तदात्यांना प्रोत्साहन म्हणून पाण्याचे जार वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तुषार कदम यांनी केले. सूत्रसंचालन नागेश फुलसुंदर तर आभार ग्रामसेवक जो. व्ही. करदोरे यांनी मानले. कार्यक्रमास गावकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यात महिलांचा सहभाग लक्षणीय होता. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यासागर फुलसुंदर, प्रभाकर साळुंके, विलास फुलसुंदर, डॉ. ज्ञानेश्वर फुलसुंदर, सोमनाथ फुलसुंदर, अमोल साळुंके, महावीर माळी, राजेश फुलसुंदर, पंडित पवार, बबन बेळे, ज्ञानेश्वर भुजबळ, आकाश भुस्कंडे, बापू फुलसुंदर, संजय फुलसुंदर, सोमनाथ साळुंके,ऋषी बिराजदार, गोविंद लोखण्डे, गणेश पाटील, विद्यासागर पाटील, दशरथ माळी, महादेव गायकवाड, विशाल हिरवे आदींनी पुढाकार घेतला.

## विठ्ठल जयवंतराव अनमुलवाड यांना राज्यस्तरीय 'समर्थ कार्यगौरव पुरस्कार २०२६'



**छत्रपती संभाजीनगर :** राज्यस्तरीय "समर्थ कार्यगौरव पुरस्कार २०२६" सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शहरातील राधे कृष्ण मंगल कार्यालय येथे आयोजित या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते मनोज जैन होते. तसेच बिकुजी लोळगे व किरण तायडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्कार वितरण पार पडले.यावेळी उपक्रमशील व विद्यार्थीकेंद्री शिक्षणासाठी ओळखले जाणारे शिक्षक विठ्ठल जयवंतराव अनमुलवाड यांना "समर्थ कार्यगौरव पुरस्कार २०२६" देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांच्या शैक्षणिक कार्याची व समाजाभिमुख उपक्रमांची उपस्थितांकडून प्रशंसा करण्यात आली. कार्यक्रमात विविध क्षेत्रातील पुरस्कारार्थींना सन्मानित करण्यात आले असून, त्यांच्या कार्याचा आढावा घेत प्रेरणादायी अनुभव मांडण्यात आले. उपस्थितांनी अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक बदल घडण्यास चालना मिळते, असे मत व्यक्त केले.समारोप प्रसंगी आयोजकांनी सर्व मान्यवरांचे आभार मानत, भविष्यातही अशा प्रकारचे प्रेरणादायी उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त केला.

## प्रा. डॉ. श्याम शिरसाठ यांच्या पत्नी वैशाली शिरसाठ यांचे दुःखद निधन



**छत्रपती संभाजीनगर :** श्रीमती वैशाली श्याम शिरसाठ (डॉ शाम शिरसाठ प्राध्यापक डॉ. बा. आ. मराठवाडा विद्यापीठ यांच्या पत्नी) वय ४७ यांचे आज दुपारी ४:३० वाजता अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात सासू,सासरे , मोठे दीर श्री सुहास शिरसाठ माजी नगराध्यक्ष, ॲड सुदेश शिरसाठ ,पती,एक मुलगी व मुलगा असा मोठा परिवार आहे. त्यांचा अंत्यविधी उद्या सकाळी १० वाजता फुलंब्री येथे होणार आहे.

१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. (Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903

## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात सतत वाचन उपक्रमाद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन





**जालना :** बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्ताने 12 एप्रिल रोजी 18 तास सलग वाचन उपक्रम ग्रंथालयात आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांमध्ये सातत्यपूर्ण अभ्यासाची सवय निर्माण होणे एकाग्रता वाढ आणि वेळेचे व्यवस्थापन हा या अभियानाचा मुख्य उद्देश होता. आज सकाळी सहा वाजेपासून या अभियानाला सुरुवात झाली यादरम्यान विद्यार्थ्यांना अल्पोपहार उपलब्ध करून दिला आणि त्याचबरोबर विद्यार्थ्यांना आवश्यक असणाऱ्या बाबींची पूर्तता करण्यात आली. दरम्यानच्या काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस वनस्पती विभाग प्रमुख डॉ. सुनिता भराडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच डॉ. प्रियदर्शन भवरे यांच्या हस्ते ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.या प्रसंगी डॉ. सुनिता भराडे यांनी बाबासाहेबांच्या जीवनातील शिक्षणविषयक आठवणी सांगितल्या. अभ्यासात सातत्य असेल तर कोणतेही यश आपणाला मिळवता येईल. शिक्षण ही विकासाची गुरुकिल्ली आहे. सारा जग बदलण्याची ताकद शिक्षणात आहे असे त्या म्हणाल्या. यावेळी प्रा. डॉ. प्रियदर्शन भवरे, डॉ. चंद्रकांत धोत्रे, प्रा. योगिता ढेंगळे, प्रा. सायरा काझी, यांची उपस्थिती होती. दरम्यानच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली ग्रंथसंपदा विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली. कार्यक्रमाचे नियोजन आणि सूत्रसंचालन ग्रंथालय विभागाचे प्रमुख आणि अंतर्गत मूल्यमापन कक्षाचे प्रमुख प्रा.डॉ. कल्याण कुंभार यांनी केले. यावेळी श्रीमती यशोदा दिघे, शिवाजी जोशी, काशिनाथ खलसे यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. यावेळी महाविद्यालयाच्या वस्तीगृहातील विद्यार्थिनी प्रामुख्याने उपस्थित होत्या.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १३ एप्रिल २०२६


## सत्यशोधक विद्यालयामध्ये क्रांती सुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी



**छत्रपती संभाजीनगर :** मानव विकास व पुर्ननिर्माण संशोधन संस्था औरंगाबाद संचलित, सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगाव तालुका भोकरदन जिल्हा जालना येथे आज दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजी सत्यशोधक विद्यालयामध्ये क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष तथा प्राचार्य श्री सुनील जी वाकेकर साहेब तसेच सिरसगाव मंडप केंद्राचे केंद्रप्रमुख श्री चमकुरे सर, भोपळे सर यांनी क्रांती सुर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन केले. याप्रसंगी विद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## भीमराया वंदाया कवन शाहीरी ने महानायक जन्मोत्सव सोहळयास जल्लोषात सुरूवात

**छत्रपती संभाजीनगर :** आनंदनगर-शिवाजीनगर प्रभाग क्र. २७ मध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांच्या २०० व्या तसेच भारतरत्न डा◌ॅ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त महानायक जन्मोत्सव सोहळयाचे उद्घाटन शनिवारी राजर्षी शाहूमहाराज उद्यान, शाहूनगर , शिवाजीनगर याठिकाणी झाली .या सोहळयाच्या पहील्या दिवशी महाराष्ट्रातील ख्यातनाम शाहीर सचिन माळी व शाहीर शितल साठे यांच्या नवयान शाहीरी जलसा ने झाली. महापुरुषांच्या विचारांना अभिप्रेत असा शाहीरी जलसा तमाम आंबेडकरी अनुयायांमध्ये एक नवीन उर्जा निर्माण करणारा होता.शाहीर शितल साठे यांनी बाबासाहेबांवर आधारीत पोवाडा भीमराया वंदाया कवन शाहीरी आंबेडकरी चळवळ गतिमान करणारा होता. पाणी वाढ गं माय .....अतिशय अंगावर काटा आणणारं गीत होतं .याने परिस्थितीची जाणीव करुन दिली. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या वर आधारीत सध्या सोशल मिडीयावर ट्रेंडींग असणारा पोवाडा विद्येविना मती गेली.....एकंदरीत महात्मा फुलेंच्या कार्यावर प्रकाश टाकणारा होता. वामन दादा कर्डकांच्या लेखनीतील प्रेरणादायी गाणे देखिल लोकांच्या मनावर ठसा उमटवणारी होती. कार्यक्रमाचे मुख्य आयोजक कैलास गायकवाड (मा.नगरसेवक) यांनी महापुरुषांच्या विचारांचा उजागर व्हावा यासाठी या कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रामाणिक प्रयत्न केला.असे प्रतिपादन केले.कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पंढरपूरजि.प.सदस्य विद्या गायकवाड प्रभाग क्रं २७ चे नगरसेवक राजु वैद्य ,नगरसेविका डा◌ॅसुनिता सोळुंके , नगरसेविका दया गायकवाड उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कैलास वाहुळे यांनी केले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समिती अध्यक्ष अशोक निकम , धन्यकुमार टिळक , देविदास खरात , प्रेम सपाटे, किशोर मगरे , सागर वंजारे , संदीप वाघमारे , अतुल प्रधान, सागर बहीरे यांनी परीश्रम घेतले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.सागर चाबुकस्वार यांनी केले.या कार्यक्रमास मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती.

## मल्लखांब ही केवळ क्रीडा नाही, तर ती एक साधना - उदय देशपांडे यांचे प्रतिपादन




**जालना :** विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक सुदृढता आणि मानसिक एकाग्रता वाढवण्यासाठी 'सातत्य, सुसूत्रता आणि सराव' हे यशाचे त्रिसूत्र आहे, असे प्रतिपादन मल्लखांब महर्षी पद्मश्री उदय देशपांडे यांनी केले. बारवाले महाविद्यालयात आयोजित विशेष कार्यशाळेत ते बोलत होते.याप्रसंगी श्री. राजेंद्रजी बारवाले, प्रभारी प्राचार्य भूषण नाफडे, श्रीमती सविता बगडिया, प्रियदर्शिनी पवार, डॉ. कविता प्राशर, श्री. गणेश सुपारकर, प्रशिक्षक राहुल सुपारकर, श्री. रावसाहेब सुपारकर, यांची यावेळी उपस्थिती होती. पद्मश्री उदय देशपांडे पुढे म्हणाले, "मल्लखांब हा जमिनीपासून २, ४, ६ आणि ८ फूट उंचीवर खेळला जातो. हा खेळ केवळ जमिनीवरचा नसून हवेत स्वतःवर नियंत्रण मिळवण्याचा सराव आहे. मल्लखांबाच्या जागतिक प्रसाराबद्दल माहिती देताना सांगितले की, जर्मनीमध्ये दरवर्षी ते विशेष वर्कशॉप आयोजित करतात ज्यामध्ये दरवर्षी १०० हून अधिक विद्यार्थी सहभागी होतात. विशेष म्हणजे, हा खेळ शिकण्यासाठी वयाचे कोणतेही बंधन नाही, कोणत्याही वयोगटातील व्यक्ती हा व्यायाम प्रकार आत्मसात करू शकते.

यानंतर सचिन मालेकर यांनी मल्लखांब आणि दोरीवरील मल्लखांबाची अत्यंत कठीण व चित्तथराक प्रात्यक्षिके सादर केली. त्यांच्या चपळाईने विद्यार्थी थक्क झाले. त्यानंतर उपस्थित महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून दोरीवरील विविध आसने करून घेण्यात आली. विद्यार्थ्यांनीही मोठ्या उत्साहात या सराव सत्रात सहभाग नोंदवला.

## श्री संचारेश्वर विद्यालयात महात्मा फुले जयंती साजरी




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** येथील संचारेश्वर विद्यालयात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.या प्रसंगी अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापिका सुमती भारती उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांनी महात्मा फुले यांच्या जीवनावर आपल्या भाषणातून प्रकाश टाकला. यानंतर प्रमुख वक्ते बाळासाहेब ठोंबरे यांनी महात्मा ज्योतिराव फुले यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य याविषयावर माहिती सांगितली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिवाजी सोमोसे, किरण नाईक, संजय गायकवाड, बाळासाहेब ठोंबरे,कृष्णा मुसळे, विवेक मुक्कावार, प्रल्हाद वैरागर, गंगाधर पांचाळ, उषा खराबे, विजयमाला फड,रूपाली सोनसळे, वर्षा गणगे, दिपाली देशपांडे, अंजली जावळे, मनिषा धाबेवार, मोनिका घोडके, राणूबाई सुग्रामकर, अश्विनी पांडे तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १३ एप्रिल २०२६

# डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालयात विद्यार्थी व पालक मेळावा उत्साहात संपन्न




**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेला विद्यार्थी व पालक मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या मेळाव्याला विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई होत्या. यावेळी विचारमंचावर प्रा. रवींद्र परभाणे, पर्यवेक्षक माधुरी भावसार, प्रा. शरद देशमुख तसेच डॉ. प्रभाकर गायकवाड, प्रा. श्याम घोरतळे यांची प्रमुख उपस्थिती होती.मेळाव्यात स्वागत गीत प्रा. शंकर विधाते यांनी सादर केले. तसेच स्त्री- पुरुष शिक्षण चळवळीचे जनक महात्मा जोतीराव फुले जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले. प्रा. रवींद्र परभणे यांनी विद्यार्थ्यांचे सर्वांगीण विकास, शैक्षणिक प्रगती आणि पालकांची भूमिका यावर सविस्तर मार्गदर्शन केले. प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून प्रेरणादायी विचार मांडत शिस्त, परिश्रम आणि योग्य नियोजनाचे महत्त्व अधोरेखित केले.यावेळी इयत्ता अकरावी वर्गातील वर्षभर झालेल्या अंतर्गत मूल्यमापन परीक्षांमध्ये उत्कृष्ट गुण संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. शाखानिहाय गुणवंत विद्यार्थी पुढीलप्रमाणे —कला शाखा - ऊणे सृष्टी अनिल, थोंटे सिद्धी अशोक, राहेरकर श्रेया गणेश वाणिज्य शाखा : परदेशी तृप्ती मनोज, राठोड रश्मी संतोष, भोले तृप्ती लक्ष्मण विज्ञान शाखा :मिरदोड साधना लक्ष्मण, दलाल वेदिका पंकज, प्रजापती प्रतिक्षा लखनदर एच.एस.व्ही.सी. :गायकवाड श्रावणी अनिल, लोखंडे पल्लवी शेकूबा, चिपळे पूजा हिरामण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शिला जिरे यांनी कुशलतेने केले, तर प्रास्ताविक प्रा ज्योती मंठाळकर यांनी मांडले.

कार्यक्रमाचा समारोप प्रा. शरद देशमुख यांच्या आभार प्रदर्शनाने झाला.या मेळाव्याला मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक उपस्थित होते, ज्यामुळे कार्यक्रमाला विशेष उत्साह प्राप्त झाला. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

# धर्म आणि धर्माचा विपर्यास

मित्रांनो धर्म ही आफूची गोळी आहे, जो प्राशन करेल तो झिंगल्याशिवाय राहणार नाही. अशी म्हण प्रचलित आहे. खरा धर्म नेमका काय असतो? आणि धर्माचा जेव्हा विपर्यास होतो तेव्हा,धर्म कसा चालतो.दोन्ही गोष्टीचं आपण इथे थोडसं चिंतन करणार आहोत. पहिल्यांदा मानवी मूल्य जतन करणारा धर्म म्हणजे काय? ते आपण पाहणार आहोत आणि धर्माचा विपर्यास करणारे लोक जेव्हा अवगुणी वागायला लागतील तेव्हा धर्माचं नेमकं काय होतं. ते आपण समजून घेनार आहोत. मानवी विकासाचा विचारचा धर्म या अर्थाने आपण धर्माकडे पाहणार आहोत. धर्म म्हणजे सत्कार्य होय दुसऱ्यांची तहान भूक ओळखणे म्हणजे धर्म होय. इथली सृष्टी सुंदर दिसायला पाहिजे म्हणून केलेलं कार्य म्हणजे धर्म होय.दुसऱ्यांना सर्वतोपरी केलेली मदत म्हणजे धर्म होय.समाजाच्या निसर्गाच्या,देशाच्या विरोधात आलेल्या संकटांना समर्थपणे तोंड देणे म्हणजे धर्म होय.अन्नदान,वस्त्रदान,विचार दान,दुसऱ्यांच्या अडचणीमध्ये जे जे सढळ हाताने मदत करतो तो धर्म होय. धर्माला रंग नसतो.धर्माला रूप नसतं.धर्माला स्वरूप सुद्धा नसतं.तर, धर्माला सत्कार्यातुन निर्माण झालेल्या सद्भावनेचा विचार असते. धर्माला विचार असतो. आचरण असतं तर धर्माला सदगुणांची मांदियाळी असते.धर्माला सत्कार्याची सोनेरी झालर असते.धर्माला परोपकाराचं सौंदर्य असतं.त्यालाच धर्म असे म्हणतात. खरा मानवी धर्म जागतिक शांततेचा,सौधार्याचा,परोपकरायचा आणि ज्या मातृभूमीमध्ये आपला जन्म झाला ती मात्र भूमी संरक्षण करण्याचा आणि मातृभूमी मध्ये सौंदर्य फुलविण्याचा यातूनच सर्व जीवांची भूक भागविले जाते. निसर्गातल्या सर्व जिवांना संरक्षण केलं जातं.सांभाळ केला जातो. त्याची वाढ होण्यासाठी मदत केली जाते. प्राणी,पक्षी, वनस्पती या सर्व गोष्टी यामध्ये येतात. जसे पृथ्वीवरती सप्तरंग आहेत ते सर्वांसाठी प्रेरणा देतात.चैतन्य देतात, शक्ती देतात,ऊर्जा देतात. विचार देतात.तसा तो सर्वगुणी बहुआयामी कार्याने सांधलेला तो म्हणजे धर्म होय. आता आपण एवढ्या चांगल्या धर्माचा विपर्यास कधी होतो.ते आपण समजून घेणार आहोत. विचाराची सुसंगती समाप्त होते. अवगुणांचा विकार जडायला लागतो. धर्मगुरूच्या अंगी शडविकार निर्माण होतात.स्वतःला धर्मचालकच म्हणवणारे लोक जेव्हा अवगुनांची उधळण करायला लागतात.सत्कार्य सोडून चांगले विचार पायदळी तुडवून विकृतीच्या विचारातून ते चालत असतात.तेव्हा धर्माचा विपर्यास होतो.धर्माची पीछेहाट होते.लोक भयभीत होतात.लोक त्या धर्म निष्ठेपासून दूर जायला लागतात.लोक धर्म बदलतात.रक्षकच जेव्हा भक्षक होतात तेंव्हा मूळ धर्म समाप्त होतो.आणि अवगुणांच्या विचारातून कुटील नीतीचा वापर करतात. वर्तन करतात.यातूनच खऱ्या धर्माची विटंबना होते.विचाराचं अस्खलन होतं.तेंव्हा मानवी मूल्याची राख रांगोळी होते.यातूनच खऱ्या धर्माचा त्या कार्याचा नायनाट होतो. आता आपण विचार करणार आहोत आपण ज्या देशात राहतो, तिथल्या धर्म विचाराची विचारधारा विकासाकडे चाललेली आहे की, लयाकडे चालली आहे. जर विकासाची वाटचाल चाललेली आहे असे आपणास वाटत असेल तर तो प्रवाह मोठा करा आणि जर अधोगतीकडे चाललेली असेल तर त्या धर्मनीतीला रोखता आलं पाहिजे.

थांबवता आलं पाहिजे. आणि विचार बदलण्यासाठी आपल्याला पुढे जाता आलं पाहिजे. चिंतन तर मला तुम्हाला आपल्या सर्वांनाच करावं लागेल. २२ व्या शतकातील भारतीयांचा धर्म जगावर राज्य करेल असा निर्माण करण्याची इच्छा आपल्यात आहे काय?आणि त्याप्रमाणे आपण सदगुणांचा विकास करणार आहोत काय? चिंतन तर आपल्या सर्वांना कराचं आहे..

**चिंतन:- भूमिपुत्र वाघ**
९१७२९७२४८२

# भीम माझा सरताज

भीम भीम भीम,भीम माझा सरताज
भीम जन्मला म्हणून, आलं समतेचं राज!!धृ!!

भीम रत्न अनमोल
भीम पाणी चवदार
मुक्त काळया रामा केलं
भीम ढाल अन् तलवार

भिमा तूझ्या जन्मामुळे आम्हा मिळाला आधार
सूर्य उगला म्हणून दूर झालाय अंधार!!१!!

तूच दाविली रे भिमा
लोकशाहीची ही वाट
केले सारे दूर काटे
वाटेवरचे घनदाट

भीम भीम भीम, भीम स्वराज्य मावळा
लेकिंच्या सुखासाठी, संसदेत तो भिडला!!२!!

भीम भीम भीम
साऱ्या वादळांचा बाप
नाव भिमाचं रे घेता
लागे दृष्टांना रे धाप

भीम फुले न् कबीर, भीम बुद्ध अन् धम्म
मुकनायकाच्या माथी, नित्य गाथा तुकाराम!!३!!

भीम भीम भीम
भीम बळीचा कैवारी
भीम बांधता धरण
पिक सोन्याचं शिवारी

भीम कष्टाचे हे हात,भीम निळाईचा साज
भीम अथांग सागर,भीम माझा सरताज!!४!!

**ज्ञानेश्वर गायके, कन्नड**

ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १३ एप्रिल २०२६


## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेच्या हस्ते बालाजी वडजे कै. अनंत भालेराव स्मृती पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** मराठी पत्रकार संघाच्या वतीने मराठवाडा स्तरावर घेण्यात आलेल्या कै. अनंत भालेराव स्मृती पत्रकारिता पुरस्कारासाठी शोध वार्ता गटात प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल रविवारी (दि.१२) राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते बालाजी वडजे यांचा सपत्नीक सत्कार करुन पुरस्कार देण्यात आला. सर्वसामान्य जनतेला कमी दराने दरमहा धान्य मिळावे यासाठी शासनाने तहसील विभागामार्फत सदरचा माल सर्व गोरगरीब जनतेला वाटप करण्यासाठी गाववाईज लोकसंख्येच्या प्रमाणात स्वस्त धान्य दूकान काढुन माल वितरणाची व्यवस्था करण्यात आली. पण महसूल विभागातील या यंत्रणेला भ्रष्टाचाराचे भिरुड लागल्याने सदरचा माल चढया दराने काळया बाजारात विक्री करण्याचा स्वतंत्र व्यवसायच काही दलालांनी सुरू करुन लोहारा तालुका गोडावुनमधील मालाची परस्पर विल्हेवाट लावल्याचे उघड झाले आहे. याबाबत दैनिक पुण्यनगरीने मालिका प्रकाशित केली होती. त्या अनुषंगाने सहाय्यक संचालक नागरी पुरवठा मुंबई यांच्या मार्फत व अप्पर जिल्हाधिकारी यांच्या अधिनस्त या दोन्ही चौकशी पथकामार्फत शासकीय धान्य गोदामाची तपासणी केली असता ३५८ क्विंटल गहु व २०८ क्विंटल तांदळ ज्याची किंमत १५ लाख १८ हजार ९१२ रुपयेचा अपहार झाला आहे. लोहारा तालुक्यातील राशनच्या मालात घपळा झाल्याबाबत दै. पुण्यनगरीने मालिका प्रकाशित केल्यानंतर गोदामपालावर गुन्हा दाखल करुन चौकशी समिती नेमली होती. या समितीने ४ जिल्हा पुरवठा अधिकारी, तहसीलदार, २ नायब तहसीलदारासह ११ जणांविरुद्ध अनियमितेचा ठपका ठेवून १५ लाख १८ हजार ९१२ रुपये त्यांचे पगारातुन वसुलसह शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस केली होती. याची स्वतंत्र मालिका लावून प्रकरण तडीस नेले होते. या यशस्वी मालिकेसाठी मराठी पत्रकार संघाच्या वतीने दै. पुण्यनगरीचे तालुका प्रतिनिधी बालाजी वडजे यांना मराठवाडा स्तरावरील कै. अनंत भालेराव स्मृती पत्रकारिताध शोध वार्ता गटात प्रथम पुरस्कार जाहिर करण्यात आला होता. रविवारी (दि.१२) धाराशिव नगरपालिका सभागृहात झालेल्या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते बालाजी वडजे यांचा सपत्नीक सत्कार करुन पुरस्कार देण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पालकमंत्री प्रताप सरनाईक होते. यावेळी माजी खासदार प्रा रविंद्र गायकवाड, माजी आमदार ज्ञानराज चौगुले, मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष धनंजय रणदिवे आदी उपस्थित होते.

## मिटमिटा डोंगरात सापडली तीस फूट खोल घळी



**दौलताबाद (जावेद अहमद) :** येथून जवळच असलेल्या मिटमिटा गावच्या उत्तरेस असलेल्या खबुतरी डोंगर रांगेत आज डोंगर भ्रमंती करत असताना डोंगर रांगेमध्ये तीस फूट खोल असलेली घळी दिसून आली व त्या ठिकाणी एक लोखंडी नाणेही सापडले. मिटमिटा येथील माती काम करणारे सतिष साहेबराव सरोदे, वय 25 .राहणार मिटमिटा व वीटभट्टी मालक सचिन मारोती सोमदे वय 30 वर्ष रा. मिटमिटा यांनी सदर घळीची माहिती इतिहास अभ्यासक डॉ.शिवाजी गायकवाड यांना ही माहिती दिली. त्यावेळी प्रत्यक्ष जागेवर पाहून बघितले असता सदर घळी ही अंडरग्राउंड वॉटर सिस्टीमचा एक भाग असू शकते अथवा जमिनीच्या खाली या ठिकाणी मोठे भुयार असण्याची शक्यता वर्तवली आहे.सदर घडी डोंगराच्या मधोमध असल्यामुळे व वरती कपार असल्यामुळे निश्चितच एक मोठा ऐतिहासिक दस्तऐवज हाती लागण्याची शक्यता वर्तवली आहे. कारण या परिसरामध्ये दौलताबाद बीबी का मकबरा मिटमिटा व छत्रपती संभाजी नगर मधील ऐतिहासिक पानचक्की यासाठी या ठिकाणाहून विविध पाण्याचे स्रोत एकत्र करून पाणचक्की, थत्ते हौद किंवा मिटमिटा येथे असलेली पुरातन कासंबरी दर्गा आहे. या परिसरात अंडरग्राउंड वॉटर सिस्टीम द्वारे पाणी घेऊन जाण्याची व्यवस्था करण्यात आलेली असावी असं प्रथम दर्शित ज्ञात होते.प्राचीन काळामध्ये वाटसरूच्या रस्त्यावर नैसर्गिक रित्या पाणी बारव तयार करण्यात येत असे .या बारावांमध्ये आजही उन्हाळ्यातही पाणी दिसून येते हा ऐतिहासिक वास्तुशास्त्राचा अजोड नमुना तत्कालीन राज्यकर्त्यांनी केलेला असावा असा निष्कर्ष निघतो. दौलताबाद--संभाजीनगर या मार्गावर हे ठिकाण आहे. दुसरा महत्त्वाचे म्हणजे हा एक व्यापारी मार्ग होता आणि या व्यापारी मार्गावर व्यापारी आपले गुप्तरित्या धन ठेवण्याचेही जागा म्हणून जमिनीच्या आत आपलं मौल्यवान वस्तू त्या ठिकाणी ठेवत असावे.असे प्रथम दर्शी ज्ञात होत आहे.

इतिहास संशोधक डॉक्टर शिवाजी गायकवाड यांनी या घटनेचा प्रत्यक्ष जाऊन उलगडा करत सदर माहिती दिली आहे.

## दौलताबाद देवगिरी किल्ल्यावर ९०० संग्राम सैनिकांनी महास्वच्छता अभियानात उत्स्फूर्त सहभाग घेतला



**दौलताबाद (जावेद अहमद) :** जगद्गुरु श्रीमद रामानंदाचार्यजी यांच्या प्रेरणेतून अखिल भारतीय हिंदू संग्राम सेना, संभाजीनगर व जालना जिल्ह्याच्या वतीने ऐतिहासिक देवगिरी (दौलताबाद) किल्ल्यावर गड-किल्ले संवर्धन व स्वच्छता अभियान मोठ्या उत्साहात शनिवारी राबविण्यात आले.या अभियानात तब्बल ८५० ते ९०० संग्राम सैनिकांनी सक्रिय सहभाग घेत गड परिसरात श्रमदान केले. किल्ल्यावरील कचरा गोळा करून स्वच्छता करण्यात आली तसेच गडाच्या संवर्धनाबाबत जनजागृती करण्यात आली.“गड-किल्ले हे आपल्या वैभवशाली इतिहासाचे प्रतीक आहेत. त्यांचे जतन व संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे,” असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

या भव्य उपक्रमामुळे देवगिरी किल्ला परिसर स्वच्छ केले असून युवकांमध्ये इतिहासाबद्दल अभिमान आणि जतनाची भावना अधिक दृढ झाली आहे. भविष्यातही असे सामाजिक उपक्रम सातत्याने राबविण्याचा निर्धार संघटनेने व्यक्त केला.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १३ एप्रिल २०२६

## महात्मा फुले - डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त मोफत आरोग्य शिबिर



**छत्रपती संभाजीनगर :** दरवर्षीप्रमाणे छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शहर व जिल्ह्यामध्ये महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती उत्सहाच्या निमित्ताने सर्वपक्षिय आंबेडकरवादी सार्वजनिक जयंती महाउत्सव समितीच्या वतीने समता फाउंडेशन,Csmss कॉलेज मेडिकल कॉलेज व रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने नागरिकांसाठी मोफत सर्व रोगनिदान आरोग्य शिबिराचे आयोजन मैत्री बुद्ध विहार येथे करण्यात आले होते. सर्वप्रथम महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन या शिबीराची सुरुवात करण्यात आली.यावेळी शेकडो नागरीकांनी या मोफत आरोग्य शिबीराचा लाभ घेतला तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करुन नागरीकांना मोफत औषधीचेही वाटप करण्यात आले यावेळी दिपकभाऊ निकाळजे, अरविंद कांबळे,अनिल बिरारे,विशाल इंगळे,मिलींद मोकळे अमित वाहुळ, आनंद कस्तुरे काकासाहेब काकडे (नगरसेवक) जोगदंड, नागेश केदारे, किशोर खिल्लारे,आनंद बोर्डे, कपिल बनकर, सोनु नरवडे, नितीन निकाळजे, नितीन सुर्यवंशी, विजय शिंगारे, मुकेश खोतकर, नितीन आदमाने,राजकुमार कांबळे, सिद्धार्थ सुर्यवंशी, विकास वाव्हळ, प्रकाशदादा निकाळजे,वसंतराज वक्ते, डॉ. विलास जोंधळे, मोहनमामा म्हस्के,राजु होर्शिळ, विष्णु जगताप, महेंद्र काटेकर, मोतीलाल त्रिभुवन,विलास जगताप, अनिल पांडे,देवानंद वानखेड़े, किशोर ससाने,सतिश गायकवाड, चंन्द्रमुनी काळे,मिलींद बन्सोडे, राजु कांबळे, हेमंत मोरे, दिपक म्हस्के,विजय शिंदे,विष्णु वाघमारे,दादाराव सोनट्टके,अनामी मोरे, गौरव मोरे, कुमार वाघमारे, राहुल गवळी,धिरज मोरे, स्वप्निल शिरसाट, कृष्णा शरणागत, विजय पैठणे,नागेश जावळे, दत्ता जाधव, प्रितेश काकडे,योगेश वर्मा,राम पाखरे, संदीप निकाळजे, योगेश सोनवणे,अविनाश डोंगरे, अक्षय जाधव, संदीप जाधव, सतीश सोनवणे, प्रशांत मस्के, आनंद दांडगे, हरिदास वानखेडे, शुभम जमधडे, रोहित परदेशी, नासिर पठाण, नितीन भगत, सचिन मगरे, कुणाल कासार,व वसाहतीतील नागरीकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सप्ताहानिमित्त विशेष व्याख्यान संपन्न



**जालना** :डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती सप्ताह निमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्राचार्य डॉ गणेश अग्निहोत्री, उप प्राचार्य प्रा. प्रवीण बाफना, उपप्राचार्य डॉ. महावीर सदावर्ते, पर्यवेक्षक डॉ .सुमंत बिक्कड, राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक प्रा. डॉ.राजेंद्र सोनवणे कार्यक्रमाधिकारी प्रा. किशोर तापडिया आदी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## प्रज्ञासूर्य डॉ बाबासाहेब आंबेडकरांना काव्यात्म शब्दांजली

महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती जगभरात जल्लोषात व स्वयंप्रेरणेने साजरी केली जाते डॉ बाबासाहेब आंबेडकरांना प्रेरणा माणून चळवळीतल्या कार्यकर्त्यांनी आणि साहित्यिकांनी बाबासाहेबांच्या स्वातंत्र्य, समता बंधुता व न्याय या मूल्यांना आपल्या साहित्यातून उजागर करून लोकशाही बळकट करण्यासाठी आपला सकारात्मक विद्रोहाचा ठसा उमटविला. असंख्य आंबेडकरी कवी, गझलकार आपल्या रचनांमधून मानवतावादी मूल्यांचे भरणपोषण करणारे वैचारिक लेखन समाजापुढे ठेवताहेत. त्यांच्या लेखनात "जयभीम" केंद्रस्थानी असून दीपस्तंभ म्हणून बाबासाहेबांचे संघर्षमयी जीवनकार्य सतत दिशादर्शक ठरते आहे.दरवर्षी जयंतीनिमित्त हजारो गीतांमधून जयभीम चा क्रांतिघोष दुमदुमत रहातो. नवीन गायक, गीतकार, संगीतकार प्रबोधनात्मक सादरीकरण करतात याची सुरुवात लोककवी वामन कर्डक यांनी बाबासाहेबांच्या हयातीत केली. शेगावचे कवी गवाजी बळीद जयभीम कवितेत, "जयभीम नारा गर्जे देश सारा भीम हा पहारा वंचितांचा" अशी उचित शब्दांजली अर्पण करतात.समकालीन गझलेला छेद देणारे नंदकिशोर दामोधरे आपल्या आंबेडकरी गझलेत व्यक्त होतात,"आजही हृदयात ठेवतो आम्ही आंबेडकर आजही रक्तात पेरतो आम्ही आंबेडकर" उठसुठ आंबेडकरांना डोक्यावर नाचवण्यापेक्षा डोक्यात घ्या हा संकुचित सल्ला देणार्यांचे कान ठिकाणावर आणण्यासाठीचे हे चोख प्रत्युत्तर आहे. अलीकडच्या राजसत्तेने पुराणमतवादी धार्मिक कर्मकांडाचे पुनर्जीवन करण्याचा सपाटा लावला आहे .अभ्यासक्रमात लोकशाही मूल्ये, संविधानाऐवजी मनाचे श्लोक, अंधश्रद्ध बनविणारा वांझ इतिहास पेरुन पुराणमतवादी संस्कार मूल्य रूजविण्याचा अट्टाहास चालवला आहे.हे वास्तव परखडपणे नंदा अधोरेखित करतात,"बघ संविधान आहे तुझ्या माझ्या हिताचे मानव सुखावयाला ध्यासात भीम आहे" "सत्ता बहाल करणे धर्मांध माणसाला समजून मग असावे श्वासात भीम आहे" ज्ञानाचे प्रतीक असणाऱ्या आंबेडकरांनी सर्वांना शिक्षणाचे दारं उघडले, त्यांच्या प्रेरणेने शोषित वंचित, उपेक्षितांच्या दु:खांवर फुंकर घालण्याचे बळ शब्दात आले .कर्नाटकात संशोधक असलेल्या विद्रोही कवी डॉ. युवराज सोनटक्के यांनी केलेले समर्पक वर्णन,"एक सुर्य माझा हाती हळू ठेविला पित्याने म्हणे जीवन विज्ञान विण आपल्या हाताने" (प्रश्नांची मातृभाषा)राज्यघटनेच्या उपोद्घातात बाबासाहेब आंबेडकरांनी जे राजकीय ध्येय मांडले त्यात समता मूल्य अग्रणी आहे.त्यांनी समताधिष्ठित संस्कारमूल्ये रूजविण्यासत्तव संपूर्ण हयात घालवली. चवदार तळ्याचा सत्याग्रह हा समान हक्कासाठीचा धर्मसंगर होता.बाबांनी माणसाला विषमतेच्या खाईत लोटणारी मनुस्मृती जाळली,ती समानतेचे तत्त्व बिंबवण्यासाठी. सुप्रसिद्ध कवी प्रा. अनंत राऊत ओजस्वी शब्दात वंदन करतात,"मनुस्मृतीचा जाळून कचरा हिरवळ केली तूंमहाडचे ते अशुद्ध पाणी निर्मळ केले तूंपरंपरेच्या चिखलामधली, जातीयतेच्या चिखलामधली नौका चालवली.....बां भीमा ,लेकरासाठी तू हयात घालवली" राजकीय व्यवस्था सत्ता हस्तगत करण्यासाठी, जातीच्या भिंती अभेद्य करीताहेत.धर्मअफूची गोळीतरूणाईला देऊन शिक्षण बंद पाडणारे नवनवीन प्रयोग करीत आहे .कवी .शशिकांत हिंगोणेकर महामानवाला अभिवादन करताना 'सूर्य फुलांच्या विश्वविद्यालयाचा कुलगुरू' संबोधतात ," त्याने मोडले आहे,तुमच्या पिढ्यानपिढ्यांच्या लेखणीचे कंबरडे.अस्मितेचे लक्ष लक्ष दिवे पेटवून" काळाची मर्यादा ओलांडणारी अरूण विघ्ने ची गझल सम्यक विचार पेरते,"जात नावाची ही भयंकर बिमारी होत आहे कालचे चवदार पाणी हे विषारी होत आहे" "आजही पाणी पिल्याने बालकाचा प्राण जातो वंचितांच्या शिक्षणाची कां शिसारी होत आहे" हाच आशय असलेली आनंदा वारांगणेंची भाव छटा,"स्पर्शानंआमच्या कसापाणवठा बाटला होतामंदिराचा ही दरवाजा बंद होता.तुमच्या रूपानंमाऊली आली घरात." आज भ्रष्टाचारात शिक्षण क्षेत्र अव्वल स्थानावर आहे.सामान्यांचे शिक्षण बंद करणारी राज्यकर्ती जमात पांघरुण घालण्यात धन्यता माणते.आंबेडकरी कविता सामाजिक मूल्य जपणारी ,माणूसपण बहाल करण्याचा आग्रह धरणारी आहे म्हणून हे काव्य नवनिर्माणाचा ध्यास घेऊन अवतरते आहे.,साठोत्तर काळात खूप मोठ्या प्रमाणावर लिहिली गेली, आंबेडकरी कवितेने मराठीचे सारं भावविश्व हादरवून सोडलं.आंबेडकरवाद म्हणजे सर्वंकष मानवमुक्तिचे तत्वज्ञान,.सम्यक क्रांतीचे तत्त्वज्ञान. आंबेडकरी काव्य प्रांताची ही तिसरी पिढी ,ह्या पिढीने बाबासाहेबांनंतर बदललेली माणसं व काळाची रूपं व्यक्त केलीत" आंबेडकरवाद" कवितेत कवी एड .शंकर रामटेके त्या विषयी कृतज्ञता व्यक्त करताना लिहितात,"विषमतेच्या गर्भाशयात समतेचे बीज पेरणारापशूरूपी मानवाच्या डोक्यात मानवतेचा मेंदू भरवणारा वाद म्हणजे - आंबेडकरवाद" प्रस्थापिततेच्या सर्वनाशाचा विडा उचलणारा बंडखोर कवी नामदेव ढसाळ यांच्या "आंबेडकर" कवितेच्या शेवटच्या कडव्याने समारोप करतो , ." जो नूतन वर्षाच्या फुलपाखरांसारखा उडतो नि प्रकाश पसरवतो.

जो रुळांबरोबर वाढत जातो. जो युनिव्हर्सिट्यांचे चिरेबंद ढिले करतो.जो स्वतंत्रते कडून स्वतंत्रतेकडेच जातो.असा तू एकूलता एक आमच्या रथाचा सारथी.जो द्विविजयी तंद्रेतून आमच्यात उतरतो.नि शेतातून, गर्दीतून,नि मोर्चातून नि लढ्यातूनआमच्या बरोबर असतो.नि आम्हाला शोषणातून सोडवितो.जो तूतोच तू आमचा" (गोलपिठा).माझी अस्मिता, भारतीय आधुनिक सृजनशील समाजाचा मानबिंदू असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना 135 व्या जयंतीदिनानिमित्त वंदन करतो.

**विद्रोही कवी,**
**ज्येष्ठ समीक्षक साहेबराव मोरे**
**चाळीसगाव**


## जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १३ एप्रिल २०२६


# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक क्रांतीकार्य

१४ एप्रिल हा दिवस भारतीय समाजजीवनात एक विशेष तेज घेऊन उगवतो. हा दिवस केवळ एका महामानवाचा जन्मदिन नसून, तो अन्यायाविरुद्धच्या संघर्षाचा, समतेच्या ध्यासाचा आणि मानवी प्रतिष्ठेच्या पुनर्स्थापनेचा स्मरणदिन आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनकार्य समजून घेतले तर हे प्रकर्षाने जाणवते की त्यांनी भारतीय समाजाला केवळ विचार दिले नाहीत, तर त्या विचारांना कृतीत उतरवून एक नवा सामाजिक इतिहास घडवला.भारतीय समाजाची पारंपरिक रचना ही अत्यंत गुंतागुंतीची आणि विषमतेने ग्रासलेली होती. जातिव्यवस्थेने समाजात उंच-नीचतेची भिंत इतकी भक्कम उभी केली होती की, काही घटकांना मानवी हक्कांपासून पूर्णतः वंचित ठेवण्यात आले होते. अस्पृश्यता ही केवळ सामाजिक भेदभावाची गोष्ट नव्हती, तर ती मानवी अस्तित्वाला नाकारणारी एक क्रूर आणि अमानुष व्यवस्था होती. अशा परिस्थितीत जन्माला आलेल्या बाबासाहेबांनी या व्यवस्थेचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. बालपणापासूनच त्यांना सहन करावे लागलेले अपमान, शाळेत पाणी पिण्याची परवानगी न मिळणे, समाजातील तिरस्काराची वागणूक या सर्व अनुभवांनी त्यांच्या मनात अन्यायाविरुद्ध तीव्र असंतोष निर्माण केला. परंतु त्यांनी या अनुभवांना दु:ख म्हणून न जगता, त्यांना परिवर्तनाच्या ऊर्जेमध्ये रूपांतरित केले.बाबासाहेबांच्या सामाजिक कार्याचा पाया म्हणजे शिक्षण होय. त्यांनी अत्यंत कठीण परिस्थितीतही उच्च शिक्षण प्राप्त केले. त्यांनी केवळ भारतातच नव्हे, तर परदेशातही शिक्षण घेतले आणि आपल्या ज्ञानाच्या बळावर समाजातील विषमतेला आव्हान दिले. त्यांच्या मते, शिक्षण हे केवळ नोकरी मिळवण्याचे साधन नसून, ते व्यक्तीच्या विचारशक्तीला विकसित करणारे आणि समाजपरिवर्तन घडवून आणणारे प्रभावी माध्यम आहे. ‘शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा’ हा त्यांचा संदेश हा केवळ घोषवाक्य नसून, तो सामाजिक क्रांतीचा मूलमंत्र आहे. त्यांच्या कार्याचा विचार करताना बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना ही एक महत्त्वाची घटना ठरते. या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी वंचित समाजासाठी शिक्षण, सामाजिक जागृती आणि स्वाभिमान निर्माण करण्याचे कार्य केले. त्यांनी लोकांना सांगितले की, आपले हक्क मिळवण्यासाठी स्वतः उभे राहणे आवश्यक आहे. त्यासाठी संघटनशक्ती आणि ज्ञानाची जोड असणे गरजेचे आहे.महाड येथील चवदार तळे सत्याग्रह हा त्यांच्या सामाजिक आंदोलनातील एक ऐतिहासिक टप्पा होता. हा केवळ पाण्यासाठीचा संघर्ष नव्हता, तर तो मानवी समानतेचा आणि स्वाभिमानाचा लढा होता. या सत्याग्रहाने संपूर्ण देशाचे लक्ष अस्पृश्यतेच्या प्रश्नाकडे वेधले. बाबासाहेबांनी स्पष्टपणे सांगितले की, “आम्हाला पाणी नको, आम्हाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क हवा आहे.” या आंदोलनामुळे वंचित समाजात आत्मविश्वास निर्माण झाला आणि त्यांनी आपल्या हक्कांसाठी लढण्यास सुरुवात केली. याचप्रमाणे नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश आंदोलनाने धार्मिक क्षेत्रातील भेदभावाला थेट आव्हान दिले. मंदिरात प्रवेश हा केवळ धार्मिक हक्क नव्हता, तर तो सामाजिक समानतेचा प्रश्न होता. बाबासाहेबांनी या आंदोलनाच्या माध्यमातून समाजाला दाखवून दिले की, धर्माच्या नावाखाली कोणत्याही प्रकारचा भेदभाव स्वीकारार्ह नाही.बाबासाहेबांच्या विचारांमध्ये तर्कशुद्धता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन स्पष्टपणे दिसून येतो. त्यांनी अंधश्रद्धा, परंपरा आणि रूढी यांच्या नावाखाली चालणाऱ्या अन्यायाला विरोध केला. त्यांच्या मते, कोणतीही सामाजिक व्यवस्था ही मानवी कल्याणासाठी असावी. जर ती मानवी हक्कांचे उल्लंघन करत असेल, तर ती बदलली पाहिजे. त्यांनी मनुस्मृतीतील विषमतावादी विचारांना विरोध करून सामाजिक क्रांतीची दिशा दिली.महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांनी केलेले कार्यही अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्या काळात महिलांना अनेक बंधनांमध्ये ठेवले जात होते. त्यांना शिक्षणाचा, संपत्तीचा आणि स्वातंत्र्याचा अधिकार नव्हता. बाबासाहेबांनी महिलांच्या हक्कांसाठी आवाज उठवला आणि त्यांना समान अधिकार मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या मते, समाजाची प्रगती ही महिलांच्या प्रगतीवर अवलंबून असते. म्हणूनच त्यांनी महिलांना शिक्षण घेण्यास आणि स्वावलंबी होण्यास प्रोत्साहन दिले.कामगारांच्या हक्कांसाठी त्यांनी केलेले कार्यही उल्लेखनीय आहे. औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना अत्यंत कठीण परिस्थितीत काम करावे लागत होते. बाबासाहेबांनी कामगारांसाठी योग्य वेतन, सुरक्षित कामाची परिस्थिती आणि मर्यादित कामाचे तास यासाठी संघर्ष केला. आठ तासांचा कामाचा दिवस ही संकल्पना त्यांनी प्रभावीपणे मांडली. यामुळे कामगारांच्या जीवनमानात मोठी सुधारणा झाली.बाबासाहेबांचे कार्य केवळ सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रापुरते मर्यादित नव्हते, तर त्यांनी राजकीय क्षेत्रातही महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीत मोलाची भूमिका बजावली. या राज्यघटनेच्या माध्यमातून त्यांनी प्रत्येक नागरिकाला समान हक्क, स्वातंत्र्य आणि न्याय मिळवून दिला. त्यांच्या या कार्यामुळे भारत एक लोकशाहीवादी आणि समताधिष्ठित राष्ट्र म्हणून उभा राहिला.धर्माच्या बाबतीत त्यांनी स्वतंत्र आणि मानवतावादी दृष्टिकोन मांडला. त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारून समाजाला समता, करुणा आणि बंधुतेचा संदेश दिला. त्यांच्या मते, धर्म हा मानवी कल्याणासाठी असावा आणि तो समाजात समानता निर्माण करणारा असावा. बौद्ध धर्माच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक परिवर्तनाचा नवा मार्ग दाखवला. बाबासाहेबांचे जीवन हे संघर्ष, जिद्द आणि धैर्य यांचे प्रतीक आहे. त्यांनी प्रत्येक अडथळ्याला संधीमध्ये रूपांतरित केले आणि आपल्या ध्येयासाठी अखंड प्रयत्न केले. त्यांच्या कार्यामुळे समाजातील वंचित घटकांना नवे आयुष्य मिळाले आणि त्यांनी स्वाभिमानाने जगण्यास सुरुवात केली.बाबासाहेबांचे कार्य केवळ सामाजिक सुधारणांपुरते मर्यादित नव्हते, तर त्यांनी भारतीय राष्ट्राच्या घडणीमध्ये मूलभूत बदल घडवून आणले. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अतुलनीय आहे. स्वातंत्र्यानंतर भारतासमोर सर्वात मोठे आव्हान होते ते म्हणजे विविधतेने नटलेल्या समाजाला एकसंध, न्याय्य आणि लोकशाहीवादी चौकट प्रदान करणे. बाबासाहेबांनी या जबाबदारीचे ओझे अत्यंत सक्षमपणे उचलले. त्यांनी तयार केलेल्या राज्यघटनेत समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले. प्रत्येक नागरिकाला मूलभूत हक्क देताना त्यांनी सामाजिक आणि आर्थिक न्यायालाही तितकेच महत्त्व दिले. त्यांच्या दृष्टीने लोकशाही ही केवळ राजकीय पद्धती नव्हती, तर ती सामाजिक जीवनपद्धती होती. राज्यघटनेतील मूलभूत हक्कांची तरतूद ही त्यांच्या दूरदृष्टीचे प्रतीक आहे. त्यांनी अस्पृश्यता निर्मूलनासाठी स्पष्ट कायदेशीर बंदी घातली. ही केवळ कायद्याची तरतूद नव्हती, तर ती शतकानुशतकांच्या अन्यायाविरुद्धची ठाम भूमिका होती. याचबरोबर त्यांनी अनुसूचित जाती आणि जमातींसाठी आरक्षणाची व्यवस्था निर्माण केली, ज्यामुळे वंचित घटकांना शिक्षण आणि नोकरीत संधी मिळाली. ही व्यवस्था सामाजिक न्यायाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली.बाबासाहेबांचे आर्थिक विचारही अत्यंत प्रगत आणि दूरदर्शी होते. त्यांनी अर्थव्यवस्थेकडे केवळ उत्पादन आणि वितरणाच्या दृष्टीने पाहिले नाही, तर त्याला सामाजिक न्यायाशी जोडले. त्यांच्या मते, आर्थिक विषमता ही सामाजिक विषमतेचे एक प्रमुख कारण आहे. त्यामुळे त्यांनी संपत्तीचे न्याय्य वितरण, कामगारांचे हक्क आणि शेतकऱ्यांचे कल्याण यावर भर दिला. त्यांनी औद्योगिकीकरणाचे समर्थन केले, परंतु त्याचवेळी कामगारांच्या हक्कांचे संरक्षण करण्यावरही जोर दिला.बाबासाहेबांनी राजकारणात प्रवेश केला तो केवळ सत्तेसाठी नव्हे, तर सामाजिक न्यायासाठी. त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना करून कामगार आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांना राजकीय व्यासपीठ दिले. त्यांनी निवडणुकांमध्ये भाग घेतला आणि वंचित घटकांच्या आवाजाला संसदेत स्थान मिळवून दिले. त्यांच्या राजकारणाचा समानता आणि न्याय केंद्रबिंदू होता.धर्माच्या बाबतीत बाबासाहेबांनी अत्यंत स्वतंत्र आणि तर्कशुद्ध दृष्टिकोन मांडला. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, धर्म हा मानवी कल्याणासाठी असावा. जर धर्म मानवी हक्कांचे उल्लंघन करत असेल, तर तो स्वीकारार्ह नाही. याच विचारातून त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारण्याचा निर्णय घेतला. बौद्ध धर्मात समता, करुणा आणि बंधुता या मूल्यांना प्राधान्य दिले जाते. त्यामुळे त्यांनी लाखो अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारून सामाजिक क्रांतीचा नवा अध्याय सुरू केला. बौद्ध धर्म स्वीकारणे हे केवळ धार्मिक परिवर्तन नव्हते, तर ते सामाजिक आणि मानसिक गुलामगिरीतून मुक्त होण्याचे प्रतीक होते. त्यांनी समाजाला दाखवून दिले की, आत्मसन्मान आणि स्वातंत्र्य मिळवण्यासाठी विचारांमध्ये बदल करणे आवश्यक आहे. त्यांच्या या निर्णयामुळे समाजातील वंचित घटकांना नवी ओळख आणि आत्मविश्वास मिळाला.बाबासाहेबांचे लेखनही त्यांच्या विचारांचा महत्त्वपूर्ण भाग आहे. त्यांनी अनेक ग्रंथ लिहून समाजातील विषमतेचे विश्लेषण केले आणि त्यावर उपाय सुचवले. त्यांच्या लेखनात तर्कशुद्धता, स्पष्टता आणि सामाजिक बांधिलकी दिसून येते. त्यांनी समाजाला विचार करण्याची आणि प्रश्न विचारण्याची प्रेरणा दिली.आजच्या काळात बाबासाहेबांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. तंत्रज्ञान आणि आर्थिक प्रगती झाली असली तरी सामाजिक विषमता अजूनही पूर्णपणे नाहीशी झालेली नाही. जात, लिंग, धर्म आणि आर्थिक स्थिती यांच्या आधारावर भेदभाव अजूनही दिसून येतो. अशा परिस्थितीत बाबासाहेबांचे विचार आपल्याला मार्गदर्शन करतात.त्यांनी दिलेला संदेश आजही तितकाच प्रभावी आहे “स्वतःवर विश्वास ठेवा, शिक्षण घ्या आणि अन्यायाविरुद्ध लढा द्या.” हा संदेश केवळ वैयक्तिक प्रगतीसाठी नाही, तर सामाजिक परिवर्तनासाठीही महत्त्वाचा आहे. बाबासाहेबांचे जीवन हे एक प्रेरणादायी उदाहरण आहे की, कठीण परिस्थितीतही आपण आपल्या ध्येयासाठी प्रयत्न करत राहिलो, तर यश निश्चित मिळते. त्यांनी आपल्या कर्तृत्वाने हे सिद्ध केले की, ज्ञान, परिश्रम आणि दृढनिश्चय यांच्या बळावर कोणतीही अडचण पार करता येते.बाबासाहेबांच्या सामाजिक चळवळींचा प्रभाव केवळ त्यांच्या काळापुरता मर्यादित राहिला नाही, तर तो आजच्या आधुनिक भारतातही प्रकर्षाने जाणवतो. त्यांनी उभारलेली समतेची चळवळ ही भारतीय समाजाच्या परिवर्तनाची पायाभूत शक्ती ठरली. अस्पृश्यता निर्मूलनासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे समाजात मोठ्या प्रमाणात जागृती निर्माण झाली. जरी आजही काही प्रमाणात भेदभाव अस्तित्वात असला, तरी त्याविरुद्ध लढण्याची ताकद आणि जाणीव समाजात निर्माण झाली आहे, हे त्यांच्या कार्याचेच फलित आहे.शिक्षणाच्या क्षेत्रात त्यांनी दिलेला भर हा आजच्या भारताच्या प्रगतीचा मुख्य आधार आहे. आज समाजातील विविध घटक उच्च शिक्षण घेऊन विविध क्षेत्रात यश संपादन करत आहेत. यामागे बाबासाहेबांनी निर्माण केलेली शैक्षणिक जागृती ही मोठी कारणीभूत आहे. त्यांनी शिक्षणाला केवळ ज्ञान मिळवण्याचे साधन न मानता, ते सामाजिक परिवर्तनाचे माध्यम मानले. आजच्या काळातही शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक विषमता कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे, ही बाब त्यांच्या विचारांचीच साक्ष देते.युवा पिढीसाठी बाबासाहेबांचे विचार अत्यंत प्रेरणादायी आहेत. आजचा युवक तंत्रज्ञान, विज्ञान आणि जागतिकीकरणाच्या युगात जगत असला, तरी त्याच्यासमोर अनेक सामाजिक आणि नैतिक आव्हाने आहेत. बेरोजगारी, स्पर्धा, सामाजिक ताणतणाव आणि मूल्यांचा ऱ्हास या समस्या आजच्या युवकांसमोर उभ्या आहेत. अशा परिस्थितीत बाबासाहेबांचा ‘शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा’ हा संदेश युवकांना दिशा देणारा आहे. त्यांनी दिलेला आत्मसन्मानाचा आणि स्वावलंबनाचा विचार युवकांना सशक्त बनवतो.महिलांच्या सक्षमीकरणाच्या बाबतीतही बाबासाहेबांचे योगदान आजही अत्यंत महत्त्वाचे आहे. आज महिलांनी शिक्षण, रोजगार, राजकारण आणि विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय प्रगती केली आहे. यामागे बाबासाहेबांनी केलेल्या कायदेशीर आणि सामाजिक सुधारणा मोठ्या प्रमाणात कारणीभूत आहेत. त्यांनी महिलांना समान हक्क मिळवून देण्यासाठी केलेले प्रयत्न आजच्या स्त्रीसशक्तीकरणाच्या चळवळींचे आधारस्तंभ आहेत.बाबासाहेबांच्या विचारांचा प्रभाव केवळ सामाजिक क्षेत्रापुरता मर्यादित नसून, तो राजकीय आणि प्रशासनिक क्षेत्रातही दिसून येतो. भारतीय राज्यघटना ही त्यांच्या दूरदृष्टीचे आणि समतेच्या तत्त्वज्ञानाचे जिवंत उदाहरण आहे. आजही देशातील न्यायव्यवस्था, शासनव्यवस्था आणि लोकशाही मूल्ये या राज्यघटनेच्या आधारावर कार्यरत आहेत. प्रत्येक नागरिकाला मिळणारे मूलभूत हक्क हे त्यांच्या कार्याचे अमूल्य योगदान आहे.समकालीन भारतात सामाजिक माध्यमांचा आणि तंत्रज्ञानाचा प्रभाव वाढला आहे. या माध्यमांद्वारे माहितीचा प्रसार जलद गतीने होत आहे. परंतु त्याचबरोबर चुकीची माहिती, द्वेष आणि भेदभाव यांचाही प्रसार होतो. अशा परिस्थितीत बाबासाहेबांचा तर्कशुद्ध आणि वैज्ञानिक दृष्टिकोन अत्यंत आवश्यक ठरतो. त्यांनी समाजाला विचार करण्याची आणि सत्य शोधण्याची प्रेरणा दिली. आजच्या काळात ही प्रेरणा अधिकच महत्त्वाची आहे.बाबासाहेबांच्या विचारांचा जागतिक पातळीवरही प्रभाव दिसून येतो. मानवाधिकार, सामाजिक न्याय आणि समानता या मूल्यांवर आधारित त्यांचे तत्त्वज्ञान जगभरात मान्य केले जाते. त्यांनी मांडलेले विचार हे केवळ भारतीय समाजासाठीच नव्हे, तर संपूर्ण मानवजातीसाठी उपयुक्त आहेत. त्यांच्या कार्यामुळे भारताला जागतिक स्तरावर एक प्रगत आणि लोकशाहीवादी राष्ट्र म्हणून ओळख मिळाली.आजच्या काळात सामाजिक न्यायाचा प्रश्न अजूनही पूर्णपणे सुटलेला नाही. आर्थिक विषमता, शैक्षणिक असमानता आणि सामाजिक भेदभाव या समस्या अजूनही अस्तित्वात आहेत. अशा परिस्थितीत बाबासाहेबांचे विचार आपल्याला योग्य दिशा दाखवतात. त्यांनी दिलेला संदेश म्हणजे संघर्षातून परिवर्तन घडवून आणण्याचा मार्ग. त्यांनी शिकवले की, अन्यायाविरुद्ध लढणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. बाबासाहेबांचे जीवन हे एक प्रेरणादायी उदाहरण आहे की, कोणत्याही परिस्थितीत आपण आपल्या ध्येयाप्रती निष्ठावंत राहिलो, तर यश निश्चित मिळते. त्यांनी आपल्या कर्तृत्वाने समाजातील प्रत्येक घटकाला उभे राहण्याची आणि स्वतःच्या हक्कांसाठी लढण्याची प्रेरणा दिली.बाबासाहेबांचे कार्य हे केवळ एका काळापुरते मर्यादित नसून ते सर्वकालीन आणि सर्वसमावेशक आहे. आजच्या समकालीन भारतात आपण वेगाने बदलणाऱ्या सामाजिक, आर्थिक आणि तांत्रिक परिस्थितीत जगत आहोत. एका बाजूला विज्ञान-तंत्रज्ञानामुळे प्रगतीचे नवीन क्षितिज खुले होत असताना, दुसऱ्या बाजूला सामाजिक विषमता, आर्थिक दरी, जातीय आणि लैंगिक भेदभाव, तसेच नैतिक मूल्यांचा ऱ्हास यांसारखी आव्हाने अजूनही कायम आहेत. या पार्श्वभूमीवर बाबासाहेबांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. सामाजिक न्याय हा बाबासाहेबांच्या विचारांचा केंद्रबिंदू होता. त्यांच्या मते, समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी मिळाल्याशिवाय खरी प्रगती होऊ शकत नाही. आजही शिक्षण, रोजगार आणि आरोग्य या क्षेत्रांमध्ये असमानता दिसून येते. ग्रामीण आणि शहरी भागातील दरी, डिजिटल विभाजन, आर्थिक दुर्बलता या समस्या समाजाच्या सर्वांगीण विकासाला अडथळा निर्माण करतात. अशा परिस्थितीत बाबासाहेबांनी मांडलेले समतेचे तत्त्वज्ञान आपल्याला या समस्यांवर उपाय शोधण्याची दिशा देते.जातीय भेदभाव हा आजही समाजातील एक संवेदनशील मुद्दा आहे. जरी कायद्याने अस्पृश्यता बंद करण्यात आली असली, तरी मानसिकतेत अजूनही बदल पूर्णपणे झालेला नाही. बाबासाहेबांनी केवळ कायदे करून थांबले नाहीत, तर त्यांनी समाजाच्या मानसिकतेत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या मते, खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवून आणण्यासाठी मनोवृत्ती बदलणे आवश्यक आहे. आजच्या काळात हीच गोष्ट अधिक महत्त्वाची ठरते.महिलांच्या सक्षमीकरणाच्या बाबतीतही अजून बरेच काम करणे आवश्यक आहे. जरी महिलांनी विविध क्षेत्रांमध्ये प्रगती केली असली, तरी त्यांना अजूनही अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. लैंगिक भेदभाव, हिंसा, आर्थिक असमानता या समस्या अजूनही अस्तित्वात आहेत. बाबासाहेबांनी महिलांना समान हक्क मिळवून देण्यासाठी केलेले कार्य आजही मार्गदर्शक आहे. त्यांच्या विचारांचा आधार घेऊन महिलांच्या सक्षमीकरणासाठी अधिक ठोस पावले उचलणे गरजेचे आहे. युवा पिढी ही देशाचे भविष्य आहे. बाबासाहेबांनी युवकांना शिक्षण आणि स्वावलंबनाचे महत्त्व पटवून दिले. आजच्या युवकांसमोर अनेक संधी उपलब्ध आहेत, परंतु त्याचबरोबर अनेक आव्हानेही आहेत. स्पर्धेचा वाढता ताण, बेरोजगारी आणि मूल्यांचा ऱ्हास या समस्या युवकांसमोर उभ्या आहेत. अशा परिस्थितीत बाबासाहेबांचा संदेश युवकांना योग्य दिशा देतो. त्यांनी दिलेला आत्मविश्वास आणि संघर्षाची प्रेरणा युवकांना सक्षम बनवते.तंत्रज्ञानाच्या युगात माहितीचा प्रसार अत्यंत वेगाने होत आहे. परंतु या माहितीच्या प्रवाहात सत्य आणि असत्य यातील फरक ओळखणे महत्त्वाचे आहे. बाबासाहेबांनी तर्कशुद्ध विचारसरणीचा पुरस्कार केला. त्यांनी अंधश्रद्धा आणि चुकीच्या समजुतींना विरोध केला. आजच्या काळात त्यांच्या या विचारांची गरज अधिक जाणवते.लोकशाही ही केवळ मतदानापुरती मर्यादित नसून ती नागरिकांच्या सक्रिय सहभागावर अवलंबून असते. बाबासाहेबांनी लोकशाहीचे तत्त्वज्ञान स्पष्ट करताना सांगितले की, लोकशाही टिकवण्यासाठी समाजात समता आणि बंधुता असणे आवश्यक आहे. आजच्या काळात लोकशाही मूल्यांचे संरक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. बाबासाहेबांचे जीवन हे एक प्रेरणादायी प्रवास आहे. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून उभे राहून समाजात परिवर्तन घडवून आणले. त्यांच्या जीवनातून आपल्याला शिकायला मिळते की, ज्ञान, परिश्रम आणि दृढनिश्चय यांच्या बळावर कोणतीही अडचण पार करता येते. त्यांनी दाखवलेला मार्ग हा संघर्षाचा, पण त्याचबरोबर आशेचा मार्ग आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण केवळ औपचारिक अभिवादन करून थांबू नये. त्यांच्या विचारांचे आचरण करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. समाजात समता, न्याय आणि बंधुता या मूल्यांची स्थापना करण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. बाबासाहेबांनी दिलेला संदेश हा आजही तितकाच प्रभावी आहे. आजच्या भारताला जर खऱ्या अर्थाने प्रगत, समतामूलक आणि न्याय्य राष्ट्र बनवायचे असेल, तर बाबासाहेबांचे विचार आपल्या जीवनात आणि समाजात रुजवणे आवश्यक आहे. शिक्षणाचा प्रसार, सामाजिक न्यायाची अंमलबजावणी, महिलांचे सक्षमीकरण आणि लोकशाही मूल्यांचे संरक्षण या सर्व बाबींच्या माध्यमातून आपण त्यांच्या स्वप्नातील भारत घडवू शकतो.शेवटी, असे ठामपणे म्हणता येईल की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक कार्य हे केवळ इतिहासाचा भाग नाही, तर ते वर्तमान आणि भविष्याचा दीपस्तंभ आहे. त्यांच्या विचारांचा प्रकाश आपल्या मार्गाला उजळून टाकतो आणि आपल्याला योग्य दिशेने वाटचाल करण्याची प्रेरणा देतो. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण सर्वांनी एकच संकल्प करूया. समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांना आपल्या जीवनात स्थान देऊन, एक न्याय्य आणि सुसंस्कृत समाज निर्माण करण्यासाठी कटिबद्ध राहया. हीच त्यांच्या कार्याला खरी आदरांजली ठरेल.




**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**ईमेल – bagate.rajendra5@gmail.com**